# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**नवी मुंबई नेरुळ सेक्टर-३ येथील सेंट झेव्हिअर्स शिक्षण संस्थेच्या विश्वस्तांनी केलेला गैरव्यवहार**

**(१) ३६४६३ (२१-०१-२०१७). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई नेरुळ सेक्टर-३ येथील सेंट झेव्हिअर्स एज्युकेशन संस्थेच्या विश्वस्तांनी गैरव्यवहार व गैरवर्तणुक केल्याप्रकरणी शालेय शिक्षण विभागाचे अवर सचिव यांच्या पत्राची दखल घेवून मा.उच्च न्यायालयाने दिनांक ३ मार्च, २०१५ रोजी शाळेवर प्रशासक नेमण्याचे आदेश देवूनही माहे जून, २०१५ पासून प्रलंबित असलेल्या याबाबतच्या प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू शाळेवर मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार प्रशासक नेमण्याच्या दृष्टीने निर्णय घेवून त्याची त्वरीत अंमलबजावणीस होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने तातडीने प्रशासक नेमण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व याबाबत सद्यस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (३०-०७-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) दिनांक २६.०५.२०१७ रोजीच्या आदेशान्वये सदर संस्थेवर प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विद्यार्थ्यांना शिक्षण हक्क कायद्यातील सोयीसुविधा मिळत नसल्याने शाळांमध्ये विद्यार्थ्यांची गळती होत असल्याबाबत**

**(२) ५५९१९ (२२-०८-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षक हक्क कायद्यानुसार इयत्ता आठवीपर्यंत मोफत शिक्षण देणे बंधनकारक असून, विद्यार्थ्यांना शिक्षण हक्क कायद्यातील तरतुदीप्रमाणे आवश्यक सोयीसुविधा प्रामुख्याने मुलींना मिळत नसल्याने शाळांमध्ये विद्यार्थ्यांची गळती होत असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त संदर्भात वर्षअखेरपर्यंत विद्यार्थ्यांना सोईसुविधा मिळण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०६-०८-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळांमध्ये सर्व शिक्षा अभियान अंतर्गत आवश्यक भौतिक सुविधा शासनाकडून देण्यात येतात.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्य क्रिडा व युवक संचालनालयाने १६ खेळांना राज्यस्तरापर्यंत शालेय क्रिडा स्पर्धा भरविण्याची मान्यता दिल्याबाबत**

**(३) ६७६१२ (२७-०१-२०१७). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य क्रिडा व युवक संचालनालयाने गत वर्षी १६ खेळांना राज्यस्तरापर्यंत शालेय क्रिडा स्पर्धा भरविण्याची मान्यता दिली होती, त्यातील ९ खेळ यावर्षी रद्द करण्यात येऊन त्या जागी नविन खेळांचा समावेश करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समावेश केलेले नविन खेळ मूळ जुनेच खेळ असल्याने, जुन्या खेळांनाच प्राधान्य देण्याची गरज आहे, असे मत अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य, क्रिडा शिक्षण महासंघ यांनी व्यक्त केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत पुनर्विचार करुन जुन्या खेळांचा समावेश करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-०८-२०१८) :** (१) नाही.

(२) नाही.

(३) सन २०१८-१९ या वर्षामध्ये शालेय क्रीडा स्पर्धेमध्ये आयोजित करावयाचे खेळ निश्चित करण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील खाजगी शाळा विविध सराव परीक्षांच्या नावाखाली विद्यार्थ्यांकडून जादा शुल्क आकारात असल्याबाबत**

**(४) ७३८४३ (०६-०५-२०१७). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील खाजगी शाळा व महाविद्यालये स्वच्छता देखभाल खर्च, जिमखाना, लायब्ररी शुल्क इ. खर्च दाखवून व एनजीओच्या मदतीच्या नावाखाली तसेच खासगी संस्था किंवा मंडळामार्फत चित्रकलेसह विविध सराव, टॅलेंट सर्च अशा परिक्षा घेतल्या जात असून त्यासाठी विद्यार्थ्यांकडून दहा रुपयांपासून दहा हजारांपर्यंत जादा शुल्क आकारले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी अनेक खासगी संस्थांचे शाळा व्यवस्थापनाशी निकटचे संबंध असल्याने काही ठिकाणी या स्पर्धा परिक्षांची सक्ती करण्यात येत असून पालकांना आर्थिक भार सहन करावा लागत असल्याने या गैरप्रकारांविषयी पालकांकडून प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने पुरस्कृत केलेल्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही स्पर्धा-परीक्षांची सक्ती न करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून या निर्णयाची अंमलबजावणी न करणाऱ्या शाळेवर कारवाई करणार असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, सदर शाळा व महाविद्यालयांकडून शिक्षकांना पाचव्या वेतन आयोगानुसार पगारही मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने घेतलेल्या उक्त निर्णयाची अंमलबजावणी प्रभावीपणे होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०१-०८-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

(४) महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ दि.१०.१२.२०१४ पासून संपूर्ण राज्यात लागू झाला आहे. अधिनियमामध्ये निर्धारित केलेल्या बाबी व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे शुल्क पालक शिक्षक कार्यकारी समितीच्या मान्यतेशिवाय घेता येणार नाही, असे जिल्ह्यातील इंग्रजी माध्यमाच्या कायम विनाअनुदानित शाळांना कळविण्यात आले आहे. अधिनियमातील तरतुदींच्या अनुषंगाने शुल्क वाढीच्या व शुल्क संदर्भात इतर तक्रारींचे निराकरण करण्यासाठी राज्यात शैक्षणिक विभागीय शुल्क नियामक समित्या गठीत करण्यात आल्या आहेत.

---

**शिरगांव (ता.जि.पालघर) येथील किल्लापाडा, मांगेला आळी, मुस्लिम मोहल्ला येथे शौचालयाची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत**

**(५) ७८३५४ (२०-०४-२०१७). श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरगांव (ता.जि.पालघर) ग्रामपंचायती अंतर्गत किल्लापाडा, मांगेला आळी, मुस्लिम मोहल्ला या भागात सन २०१३ मध्ये स्थानिक लोकांकरिता सार्वजनिक शौचालये बांधण्यात आली होती, परंतु एकाही शौचालयाला दरवाजा नसून दरवाजाच्या ठिकाणी कापडाचे पडदे बांधले असल्यामुळे लोकांची तसेच विशेषतः स्त्रियांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिरगांव भागात २८३ वैयक्तिक शौचालय बांधण्याचे उद्दीष्ट शासनाने ठरविले असतांना फक्त ३२ लाभार्थ्यांना निधी देण्यात आला असून ४३ प्रस्ताव पुढे पाठविण्यात आले असून २०८ कुटुंबे अजूनही शौचालयाचा प्रतिक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने २०८ कुटुंबाना उक्त निधी तात्काळ मंजूर करणे, निकृष्ट दर्जाची शौचालय बांधणाऱ्या कंत्राटदारांवर तसेच संबंधितांवर कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०४-०७-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

शिरगाव ग्रामपंचायतीमध्ये सन २०१२ च्या पायाभूत सर्वेक्षणानुसार शौचालय नसलेल्या तसेच अनुदानास पात्र असलेल्या कुटुंबांची संख्या २८३ होती. त्यापैकी २१६ कुटुंबांना शौचालयाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर अनुदानाचे वाटप करण्यात आले आहे.

उर्वरीत कुटुंबांपैकी ३९ कुटुंबे सार्वजनिक शौचालयाचा तर ९ कुटुंबे सामुदायिक शौचालयाचा वापर करीत आहेत. स्थलांतरीत, मृत व दुबार नोंद झालेल्या १९ कुटुंबांची नावे यादीतून वगळण्यात आली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासकीय शाळातील शिक्षक अवैध खासगी शिकवण्या घेत असल्यबाबत**

**(६) ७९८३३ (२०-०४-२०१७). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये मोठ्या प्रमाणात शासकीय शाळातील शिक्षक अवैध खासगी शिकवण्या घेऊन शाळेतील विद्यार्थ्यांना शाळेमध्ये दिल्या जाणाऱ्या २०% प्रॅक्टीकलचे अमिष दाखवून आपल्याच शिकवण्यामध्ये प्रवेश घेण्यासाठी जबरदस्ती करीत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विरोधात प्रोफेशन टीचर्स असोशिएशन यांनी एकत्र येऊन आंदोलन सुरु केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यामध्ये अश्या एकूण किती अधिकृत शिकवण्या आहेत,

(४) असल्यास, शासनाने सदरील प्रकरणाची चौकशी करुन संबंधीत दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे तसेच याबाबतची नेमकी सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (२७-०८-२०१८) :** (१) सदर बाब निदर्शनास आली नाही.
(२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील टायपिंग संस्थांमध्ये टायपिंग मशीन बंद करून**
**संगणकावर टायपिंग सुरु करण्याबाबत**

**(७) ८६१०३ (२१-०८-२०१७). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील टायपिंग संस्थांमध्ये टायपिंग मशीन बंद करून संगणकावर टायपिंग सुरु करण्याबाबत राज्य शासनाने माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निर्णय घेतला असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबतचा अध्यादेश दिनांक ३१ ऑक्टोंबर, २०१३ मध्ये वा त्यासुमारास काढला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निर्णयाला टायपिंग संस्थांनी विरोध केल्याचे व त्यामुळे जवळपास १० हजार शिक्षक बेरोजगार होणार असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने प्रश्नोक्त भाग (१) व (२) बाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०१-०९-२०१८) :** (१), (२), (३) व (४) राज्यातील शासनमान्य टंकलेखन व लघुलेखन वाणिज्य संस्थांमध्ये संगणक टंकलेखनासोबतच दि.३० नोव्हेंबर, २०१९ पर्यंत मॅन्युअल टंकलेखन अभ्यासक्रम सुरु ठेवण्यास शासनाने दि. १९ नोव्हेंबर, २०१७ च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र या उपक्रमांतर्गत जलद प्रगत शैक्षणिक कार्यक्रम राबविण्याच्या निर्णयाबाबत

**(८) ८७९५४ (२३-०८-२०१७). श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र या उपक्रमांतर्गत जलद प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील शाळा डिजीटल करण्यासाठी शिक्षण विभाग व रोटरी साऊथ एशियन सोसायटी यांच्यामध्ये सामंजस्य करार झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, डिजिटल शाळा करण्याच्या उपक्रमात राज्यातील एकूण किती प्राथमिक व माध्यमिक शाळांचा समावेश आहे व या उपक्रमाचे स्वरुप काय आहे,
(४) असल्यास, शिक्षण विभाग व रोटरी साऊथ एनिशन सोसायटीतील कराराच्या अनुषंगाने अंमलबजावणी सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत हे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०१-०९-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) राज्यातील १८,५१० शाळांमध्ये हा उपक्रम राबविला जाणार आहे.
(४) दि.१९.४.२०१७ च्या शासन परिपत्रकानुसार कार्यवाही करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासनाच्या शिक्षण विभागाच्या दुर्लक्षामुळे शासकीय विद्यानिकेतनची झालेली दुरवस्था

**(९) ८९४९१ (२३-०८-२०१७). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाने सन १९६७ मध्ये ग्रामीण भागातील गुणवंत विद्यार्थ्यांची प्रगती व्हावी यासाठी शासकीय विद्यानिकेतने या निवासी शाळा सुरु केल्या होत्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षण विभागाच्या दुर्लक्षामुळे सदर निवासी शाळांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर शासकीय विद्यानिकेतनच्या समस्या दूर करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०७-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे
(२) व (३) विद्यानिकेतनाचे परिवर्तन (Reformation) करण्याची बाब तपासण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांकडून बोर्डाच्या परीक्षेच्या रक्कमेपेक्षा जादा रक्कम वसूल केली जात असल्याबाबत

**(१०) ९५३२९ (२९-१२-२०१७). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शिक्षण मंडळाने दहावी बोर्डाच्या परीक्षेचे नियमित शुल्क ३७५ रुपये निश्चित केलेले असतानाही मुंबईतील अनेक शाळांनी विद्यार्थ्यांकडून सदर शुल्कापोटी दीड हजार रुपये वसूल केले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार विद्यार्थ्यांकडून दहावी बोर्डाच्या परीक्षेचे तिपटीहून अधिक शुल्क वसूल करणाऱ्या शाळांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०१-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## येवला (जि.नाशिक) तालुक्यातील राजापूरसह ४१ टंचाईग्रस्त गावांसाठी नवीन प्रादेशिक पाणीपुरवठा योजना सुरु करण्याबाबत

**(११) ९६३४४ (२९-१२-२०१७). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) तालुक्यातील राजापूरसह ४१ टंचाईग्रस्त गावांसाठी मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमामधून नवीन प्रादेशिक पाणीपुरवठा योजना करण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाने दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजीच्या पत्रान्व्ये शासनास पूर्वव्यवहार्यता अहवाल पाठवला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील पूर्वव्यवहार्यता अहवालाच्या अनुषंगाने सदर प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेस मंजुरी देण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ९ आक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) नुसार टंचाईग्रस्त असलेल्या राजापूरसह ४१ गावांसाठी (ता.येवला) प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेस मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (३०-०६-२०१८) :** (१) होय.

(२) होय.

(३) विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### दहिसर (मुंबई) येथील इस्त्रा शाळेतून दहावीच्या उत्तरपत्रिकांची झालेली चोरी

**(१२) ९६९५९ (२९-१२-२०१७). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील दहिसर येथील इस्त्रा शाळेतून इयत्ता १० वीच्या ५१६ उत्तरपत्रिका असून त्या चोरीस गेल्या कोणकोणत्या विषयाच्या होत्या तसेच विलेपार्ले येथील हॉटेलमध्ये बसून व्हीडीओ व्हायरल झालेली उत्तरपत्रिका व चोरीस गेलेली उत्तरपत्रिका एकच असल्याबाबतची शासनाने खातरजमा केली आहे काय,

(२) तसेच विरार येथील माऊंटमेरी शाळेच्या मुख्याध्यापकांनी व इतर कर्मचाऱ्यांनी बारावीच्या प्रश्नपत्रिका वेळेआधीच व्हॉटसअ‍ॅपवर व्हायरल केल्या प्रकरणी विभागीय मंडळाने केलेल्या चौकशीत काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आडळून आले व त्यानुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०१-०९-२०१८) :** (१) दहिसर (मुंबई उपनगर) येथील शाळेतून ४८१ उत्तरपत्रिका चोरीस गेल्या होत्या. यामध्ये इतिहास, विज्ञान भाग-१ व संस्कृत विषयाच्या उत्तरपत्रिका होत्या. विलेपार्ले येथील हॉटेलमध्ये बसून उत्तरपत्रिका तपासण्याच्या प्रसारित झालेल्या व्हिडीओमधील उत्तरपत्रिका व दहिसर मधून चोरीस गेलेली उत्तरपत्रिका एकच असल्याची खात्री पटलेली नाही.

(२) प्रश्नपत्रिका व्हॉटसॲपवर प्रसारित झालेली अनुषंगाने माऊंट मेरी कनिष्ठ महाविद्यालयाची चौकशी केली असता महाविद्यालयामध्ये अनेक अनियमितता व त्रुटी असल्याचे आढळून आले आहे.

(३) दहिसर येथील शाळेतील विद्यार्थ्यांना राज्य मंडळाच्या गोपनीय तरतूदीनूसार गुणदान करण्यात आले आहे. विरार येथील माऊंट मेरी लिपीक या दोघांना निलंबित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिल्लोड (जि.औरंगाबाद) तालुक्यातील पाणी टंचाईवर उपाययोजना करण्याबाबत**

**(१३) १०२६९१ (२६-१२-२०१७). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिल्लोड (जि.औरंगाबाद) तालुक्यातील मध्यम व लघु प्रकल्पांतील पाण्याची पातळी खालावली असल्याने पाणी टंचाई निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त तालुक्यात निर्माण होणा-या पाणी टंचाईवर उपाययोजना करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१७-०७-२०१८) :** (१) होय.

(२) याबाबत तहसीलदार सिल्लोड, गट विकास अधिकारी, पंचायत समिती सिल्लोड व इतर अधिका-यांची बैठक घेवून तात्काळ उपाययोजना म्हणून मध्यम व लघु प्रकल्पातील असलेले पाणी जास्त दिवस उपयोगात आणण्याचे दृष्टीने त्यातील उपलब्ध पाण्याचा उपसा होऊ नये म्हणून, लाभार्थी गावांचे विद्युत डि पी. कनेक्शन काढण्यात आले.

पाणी टंचाई वर मात करण्यासाठी १.१०.२०१७ ते ३०.०६.२०१८ या कालावधीसाठी पाणीटंचाई निवारणार्थ कृती आराखडा मंजूर करुन त्यात प्रस्तावित केल्यानुसार सिल्लोड तालुक्यात खालील उपाययोजनांना जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

(अ) २७ गावात ४३ टँकरद्वारे पाणीपुरवठा,

(ब) २९ गावात ३० खाजगी विहीर अधिग्रहण करुन पाणीपुरवठा,
(क) ०२ गावात ०२ तात्पुरती पुरक नळ योजना तसेच,
(ड) ०९ गावात ०९ नळ योजना विशेष दुरुस्ती
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात स्वच्छ भारत अभियानातंर्गत देण्यात येणाऱ्या निधीचा गैरवापर रोखण्याबाबत**

**(१४) १०२९९९ (३०-१२-२०१७). डॉ.आशिष देशमुख (काटोल) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात स्वच्छ भारत अभियानातंर्गत गावांना हागणदारीमुक्त करण्याचा शासनाचा संकल्प आहे शौचालय बांधकामासाठी प्रशासनाकडून लाभार्थ्यांची निवड करण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त योजनेंतर्गत लाभार्थ्यास दोन टप्प्यात निधी देण्यात येतो अनेक जण शौचालयाच्या नावे निधीची उचल करुन शौचालय बांधत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व व त्यानुसार उक्त निधीचा गैरवापर थांबविण्यासाठी कोणती कार्यवाही केली व संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१८-०७-२०१८) :** (१) होय.

सन २०१२ च्या पायाभूत सर्वेक्षणानुसार ज्या कुटुंबाकडे शौचालय नाही, अशा दारिद्रय रेषेखालील सर्व कुटुंबे, दारिद्रय रेषेवरील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भूमीहीन मजूर, लहान व सीमांत शेतकरी, महिला कुटुंब प्रमुख व शारीरिक दृष्टया दिव्यांग कुटुंबे ही केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार लाभार्थी आहेत.

(२) स्वच्छ भारत मिशन (ग्रा) अंतर्गत केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार लाभार्थ्यांना दोन टप्प्यांमध्ये प्रोत्साहनात्मक अनुदान देण्याचे प्रावधान करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्यातील ३४ ग्रामीण जिल्ह्यांपैकी वाशिम जिल्ह्यातील मानोरा तालुक्यातील गादेगाव ग्रामपंचायत मध्ये तीन लाभार्थ्यांनी चुकीच्या पद्धतीने शौचालय अनुदान घेतले असल्याचे निदर्शनास आले. सदर लाभार्थ्यांकडून रू. ३६०००/- प्रोत्साहन अनुदान पंचायत समिती, मानोरामार्फत वसूल करण्यात आले आहे. मंगरूळपीर तालुक्यातील कवठळ ग्रामपंचायतीमध्ये २९ लोकांकडे शौचालय नसल्याचे निदर्शनास आले असून संबंधित लाभार्थ्यांकडून अनुदान वसूलीची कार्यवाही सुरू आहे.

तसेच जिल्हा परिषद, नागपूर अंतर्गत रामटेक तालुक्यातील नगरधन ग्रामपंचायतीमध्ये माहे एप्रिल २०१७ मध्ये एका लाभार्थ्याने शौचालय बांधकाम केले नसताना अनुदान घेतल्याचे निदर्शनास आले. तसेच मौदा तालुक्यातील घोटमुंडरी ग्रामपंचायतीकडे रू.१,०८,०००/- इतका

निधी वर्ग करण्यात आला होता, परंतु ६ लाभार्थ्यांनी वैयक्तिक शौचालय बांधले नसल्याचे निदर्शनास आल्यामुळे रू.७२,०००/- निधी ग्रामपंचायतीकडून परत घेण्यात आला आहे. तसेच कुही तालुक्यातील मांढळ ग्रामपंचायतीकडून पायाभूत सर्वेक्षणा बाहेरील व दुबार लाभार्थ्यांना अनुदान दिल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) याबाबत वाशिम जिल्हा परिषदेमार्फत चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्यात येत आहे. नागपूर जिल्हा परिषदकडून नगरधन व मांढळ ग्रामपंचायतींच्या सचिवांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली आहे.

तसेच निधीचा गैरवापर होऊ नये, याकरिता जिल्हा परिषद मार्फत पंचायत समिती स्तरावरून प्रस्तावांची पडताळणी झाल्यानंतरच जिल्हास्तरावरून निधी वितरीत करण्यात येतो. तसेच पंचायत समिती व जिल्हास्तरावरुन ग्रामपंचायतीमधील शौचालयाची वेळोवेळी तपासणी करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील वैधमापन (प्रयोगशाळा) कार्यालयाच्या प्रलंबित प्रस्तावाबाबत**

**(१५) १०५६६२ (०५-०४-२०१८). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील सहा. नियंत्रण वैधमापन (प्रयोगशाळा) कार्यालयासाठी शहरातील रमणमळा येथील गट नं. ८७३/१ ब अशी सुमारे एक हजार चौ.मी. जागेचा प्रस्ताव जिल्हा प्रशासनाने ३ वर्षापूर्वी सादर केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कार्यालयाच्या बांधकामाकरिता शासनाकडून रुपये १ कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ३ वर्षे उलटूनही सदर जागा ताब्यात मिळाली नसल्याने कार्यालयाचे काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जागा उपलब्ध करूनही नियंत्रण वैधमापन (प्रयोगशाळा) कार्यालयाचे काम तत्परतेने सुरु होणेबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत, तसेच याकरिता लागणारा कालावधी किती आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२१-०८-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) सहायक नियंत्रक यांनी दि.१/२/२०१३ रोजी कोल्हापूर शहरातील ४ निरीक्षक, वैधमापन शास्त्र विभागांसाठी व प्रयोगशाळेसाठी जागेच्या मागणीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना सादर केला होता. तथापि, जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी सदर प्रस्ताव अमान्य केलेला आहे.

---

**लासलगाव - विंचूरसह १६ गांवे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेतील मुख्य ऊर्ध्व वाहीनीच्या नूतनीकरणाबाबत**

**(१६) १०६००२ (१४-०४-२०१८). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लासलगाव - विंचूरसह १६ गांवे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेतील मुख्य ऊर्ध्व वाहीनीच्या नूतनीकरणाची स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २३ फेब्रुवारी, २०१६ व दिनांक १३ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नाशिक यांचेकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पाणीपुरवठा योजनेची मुख्य उर्ध्व वाहीनी फुटल्यामुळे हजारो लिटर पाणी दिनांक ३० डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यासुमारास वाया गेले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, लासलगाव - विंचूरसह १६ गांवे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या मुख्य उर्ध्व वाहीनीच्या नूतनीकरणाबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०२-०७-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) अंशत: खरे आहे,

सदर योजनेची कामे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पूर्ण करण्यात आली असून योजनेची दैनंदिन देखभाल दुरूस्ती ही संयुक्त ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीमार्फत करण्यात येत आहे.

सदर योजनेचे संकल्पित वर्ष २०३१ असून योजनेव्दारे किरकोळ दुरूस्ती वगळता पाणी पुरवठा सुरू आहे.

सदर योजनेसाठी ग्रामीण पाणी पुरवठा देखभाल व दूरूस्ती निधी अंतर्गत सन २०१५-१६ मध्ये रू २८.९६ लक्ष, सन २०१६-१७ मध्ये रू २१.४५ लक्ष व सन २०१७-१८ मध्ये २२.०९ लक्ष इतके प्रोत्साहन अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे.

सदर योजनेचा संकल्पन कालावधी संपलेला नसल्याने अस्तित्वातील उर्ध्ववाहिनी न बदलता सतत होणारी पाईप गळती थांबविण्यासाठी आवश्यक उपाययोजनां करण्याची कार्यवाही जिल्हा परिषद स्तरावर करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शहापूर (जि. ठाणे) येथील क्रीडा संकुलाचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(१७) १०७२९० (०६-०४-२०१८). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) येथील क्रीडा संकुलास मंजूरी व निधी मिळूनही जागेअभावी संकूलाच्या कामास सुरुवात करण्यात आली नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहापूर येथे क्रीडा संकुलासाठी जागेची उपलब्धता करुन क्रीडा संकुल लवकरात लवकर बांधणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२८-०६-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) मौ.खर्डी, ता.शहापूर, जि.ठाणे येथील स.नं.२६१/अ/१ क्षेत्र १५-२६-५३ हे.आर. जमीन तालुका क्रीडा संकुलास उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, कोकण यांनी दिनांक ०५.०६.२०१८ च्या पत्रान्वये शासनास सादर केला असून सदर प्रस्ताव उचित निर्णयार्थ शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मालेगांव (ता.जि.नाशिक) मधील म्हाळदे शिवार येथील जागा शासकीय तंत्रनिकेतन महाविद्‌यालयासाठी देण्याबाबत**

**(१८) १०९९७७ (०५-०४-२०१८). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगांव (ता.जि.नाशिक) येथील महानगरपालिका हद्दीत म्हाळदे शिवार येथील भुमापन क्र.०४ पेकी ब/१, अ/१ या पेकी ५ एकर जागा शासकीय तंत्रनिकेतन महाविद्‌यालयासाठी अल्पसंख्याक विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना हस्तांतर करणे करिता मालेगाव महासभेने मंजूरी दिली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर महाविद्‌यालयासाठी वसतीगृह, खेळाचे मैदान, कम्युनिटी सेंटर, अदययावत प्रयोग शाळा व अनिवार्य निवासस्थाने इत्यादी स्थापन करण्याच्या दृष्टीने १५ एकर अतिरिक्त जागा आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०२-०८-२०१८) :** (१) होय.
याबाबत मालेगांव महानगरपालिकेमार्फत मा.महासभा ठराव क्र.११ दिनांक २० जुलै, २०१७ अन्वये ठराव पारित करण्यात आला आहे.
(२) व (३) सदर महाविद्‌यालयासाठी वसतिगृह, खेळाचे मैदान, अद्‌ययावत प्रयोगशाळा व अनिवार्य निवासस्थाने इ.स्थापन करण्याच्या दृष्टीने १५ एकर अतिरिक्त जागा अशी एकूण २०

एकर जागा अल्पसंख्याक विकास विभागास उपलब्ध करून देण्याबाबत मा.महासभा ठराव क्र.११, दि.२० जुलै, २०१७ रोजी ठराव पारित झाला आहे. याबाबत जिल्हाधिकारी, नाशिक यांजकडून पुढील उचित कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात अल्पसंख्यांक दिवस साजरा करण्याबाबत**

**(१९) १११३२२ (०५-०४-२०१८). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संयुक्त राष्ट्र संघटनेने दिनांक १८ डिसेंबर, १९९२ रोजी राष्ट्रीय, वांशिक, धार्मिक आणि भाषिक अल्पसंख्यांकांच्या हक्काचा जाहिरनामा स्वीकृत करून प्रस्तूत केला असून, त्यानुसार अल्पसंख्यांकांना त्यांची संस्कृती, भाषा, धर्म, परंपरा इत्यादींचे संवर्धन करण्यात यावे तसेच याबाबतचे वैशिष्ट यांची प्रभावीपणे अभिव्यक्ती करता यावी या दृष्टीने प्रयत्न करण्याबाबत राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोगाने सूचना दिल्या असून त्यानुसार दिनांक १८ डिसेंबर, हा दिवस अल्पसंख्यांक हक्क दिवस, म्हणून महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोगामार्फत राबविण्यात येतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,शिक्षण विभागाने दिनांक १६ डिसेंबर, २०१७ रोजीच्या परिपत्रकान्वये दिनांक १८ डिसेंबर हा दिवस अल्पसंख्यांक हक्क दिन साजरा करण्याबाबतच्या सूचना दिल्या असून उक्त सूचना शाळांना अत्यल्प वेळ मिळाल्याने अल्पसंख्यांक हक्क दिन साजरा करण्याकरिता, भिंतीपत्र स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा या कार्यक्रमातील विजेत्यांना पारितोषिके व्याख्यानमाला, चर्चासत्र, परिसंवाद इत्यादी आयोजित करण्यास वेळ मिळाला नसल्याने अल्पसंख्यांक हक्क दिन साजरा करता आला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,असल्यास, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार अल्पसंख्यांक हक्क दिवस साजरा करण्याबाबतच्या सूचना उशीरा पाठविणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच अशा प्रकारे पुनरावृत्ती होऊ नये याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे का आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०२-०८-२०१८) :** (१) संयुक्त राष्ट्र संघटनेने दि.१८ डिसेंबर, १९९२ रोजी राष्ट्रीय, वांशिक, धार्मिक आणि भाषिक अल्पसंख्याकांच्या हक्काचा जाहीरनामा स्विकृत करुन प्रस्तृत केला आहे. त्यानुसार अल्पसंख्याक नागरिकांना त्यांची संस्कृती, भाषा, धर्म, परंपरा इत्यादींचे संवर्धन करता यावे, तसेच याबाबतचे वैशिष्ट्यांची प्रभावीपणे अभिव्यक्ती करता यावी यादृष्टीने प्रयत्न करण्याबाबत राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाने सूचना दिल्या असून दि.१८ डिसेंबर हा दिवस "अल्पसंख्याक हक्क दिवस" महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगामार्फत राबविण्यात येतो. याबाबत अल्पसंख्याक विकास विभागाने शासन परिपत्रक क्र.अविवि-२०१६/प्र.क्र.१८७/का.८, दि.१४ नोव्हेंबर,२०१७ अन्वये सूचना निर्गमित केल्या आहेत.

(२) महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाने दि.५ डिसेंबर, २०१७ च्या पत्रान्वये सर्व जिल्हाधिकारी व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांना सूचित केले आहे. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडून याबाबत कोणतेही परिपत्रक निर्गमित करण्यात आलेले नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात शिक्षकांना देण्यात देण्यात येणा-या अशैक्षणिक कामांबाबत**

**(२०) १११४०१ (०६-०४-२०१८). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शासनाने गत दोन वर्षात नवनवीन प्रयोग सुरु करुन अडचणीचे शिक्षण धोरण अवलंबिविले असून शिक्षकांवर अशैक्षणिक कामे लादून त्यांना अध्यापनापासून दूर ठेवले जात असल्याने राज्य शासनाचे हे धोरणच शैक्षणिक गुणवत्ता घसरण्यास कारणीभूत ठरत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिंधुदूर्गनगरी येथे महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण समितीचे १६ व्या त्रैवार्षिक राज्य अधिवेशनामध्ये जिल्हा बँकेचे अध्यक्ष श्री.सतीश सावंत यांनी पटसंख्येऐवजी वर्गनिहाय  शिक्षक मिळायलाच हवे असे प्रतिपादन केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२८-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) अशा प्रकारचे प्रतिपादन केले असल्याचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांनी त्यांच्या दि.२.६.२०१८ रोजी शासनास सादर केलेल्या अहवालात नमूद केले आहे.
(३) व (४) बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतूदी विचारात घेऊन राज्यातील प्राथमिक, उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळांतील विद्यार्थी संख्येच्या आधारे शिक्षक संख्या निश्चित करण्याबाबत शासन निर्णय दि.२८ ऑगस्ट, २०१५ अन्वये निर्णय घेण्यात आला आहे. सदर शासन निर्णयानुसार शिक्षक पद संख्या ठरविण्यात येते.

---

**राज्यात मॅट्रिकेत्तर व्यावसायिक अभ्याक्रमांसाठी जात प्रमाणपत्राची सक्ती करण्यात येत असल्याबाबत**

**(२१) ११२१२५ (०४-०५-२०१८). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.मोहन फड (पाथरी), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मॅट्रिकोत्तर व्यावसायिक अभ्याक्रमांसाठी जात प्रमाणपत्र सादर करण्याची अट लागू नसतानाही त्यासाठी सक्ती केली जात असल्याने हजारो विद्यार्थी त्रस्त झाले असल्याचे दिनांक २३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, शिष्यवृत्तीची ऑनलाईन प्रक्रिया ऑफलाईन केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे राज्यातील हजारो विद्यार्थी त्रस्त झाले असून शैक्षणिक वर्ष निघून गेले तरीही अद्याप विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली नाही, हे ही खरे आहे,

(४) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय, त्यानुसार विद्यार्थ्यांना दिलासा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (३०-०७-२०१८) :** (१) हे खरे नाही.

तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखाली राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत, शासकीय/अशासकीय अनुदानित पदविका व पदवी, पदव्युत्तर (एम.बी.ए./एमसीए) संस्था, खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित संस्था यामध्ये, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी संस्थेच्या शिक्षण शुल्काच्या ५० टक्के शुल्क शिष्यवृत्ती म्हणून अदा करण्यात येते.

सदरहू योजनेंतर्गत कोणत्याही व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी जात प्रमाणपत्र सादर करण्याची अट लागू वा सक्ती करण्यात आलेली नाही. मात्र, व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेताना विद्यार्थी ज्या मागास प्रवर्गाच्या जागेसाठी दावा करीत असेल त्या पुष्ठयर्थ त्याने जात प्रमाणपत्र दाखल करणे आवश्यक करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखाली सदर योजना ऑनलाईन प्रक्रियेव्दारेच राबविण्यात येते.

(३) नाही.

तथापि, तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखाली सन २०१७-१८ साठी सदर योजनेकरीता ८४,३९३ एवढया पात्र विद्यार्थ्यांना रुपये २८४.७४ कोटी एवढया शिष्यवृत्तीची रक्कम वाटप करण्यात आलेली आहे. उर्वरित विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीची रक्कम संबंधित संस्थांच्या खात्यात जमा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती / फ्रीशीप संबंधित प्रशासनिक विभागाकडून मंजूर करण्यात येते. यासाठी त्यांना जात प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील इतर मागास प्रवर्गातील उमेदवारांना विधी महाविद्‌यालयामध्ये प्रवेश प्रक्रीयेकरीता किमान ४२ टक्के गुणांची अट निश्चित करण्याबाबत

**(२२) ११२२०२ (०५-०४-२०१८). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विधी महाविद्‌यालयतील ३ व ५ वर्षे कालावधीच्या विधी अभ्यासक्रमाकरीता इतर मागास प्रवर्गातील इच्छुक उमेदवारांना सामाहिक प्रवेश परिक्षेकरीता किमान ४२ टक्के गुणाची अट निश्चित करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान मा.शिक्षण मंत्री यांच्याकडे निवेदनाद्‌वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इतर मागास प्रवर्गातील इच्छुक उमेदवारांकरीता बार कॉन्सील ऑफ इंडीयाने इच्छुक उमेदवारांना विधी अभ्यासक्रमाकरिता निश्चित केलेल्या गुण निकषाची राज्यात अंमलबजावणी न केल्यामुळे इतर मागास प्रवर्गातील इच्छुक उमेदवारांवर अन्याय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार राज्यातील इतर मागास प्रवर्गातील इच्छुक उमेदवारांना विधी महाविद्‌यालयामध्ये प्रवेश घेण्यास सुलभ व्हावे यासाठी प्रवेश प्रक्रीयेकरीता किमान अट निश्चित करण्यात बाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-०८-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अशी वस्तुस्थिती नाही.

(३) विधी अभ्यासक्रमाच्या प्रवेशाच्या प्रयोजनासाठी आवश्यक पात्रतेच्या अटी व शर्तीमध्ये सुधारणा करुन, शासन अधिसूचना दिनांक १९.५.२०१८ अन्वये विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांकरिता गुणांची टक्केवारी किमान ४२% एवढी विहित करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शहापूर (जि.ठाणे) आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत १४ अनुदानित आश्रमशाळांचा धान्य पुरवठा बंद करण्यात आल्याबाबत**

**(२३) ११२५५५ (२०-०४-२०१८). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत १४ अनुदानित आश्रमशाळांना रेशनिंग धान्यांतर्गत ७६५ रुपये क्विंटल तांदूळ आणि ४२५ रुपये क्विंटल गहू या दराने उपलब्ध करुन देण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहापूर तहसील विभागांतर्गत असलेल्या पुरवठा विभागाच्या धान्य गोदामात तुटवडा असल्याने सदरहू आश्रमशाळांना माहे एप्रिल, २०१७ पासून शासनाच्या पुरवठा विभागांकडून तांदूळ व गहू यांचा पुरवठा बंद करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहापूर तहसील विभागात उक्त धान्याचा तुटवडा होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार नियमित धान्याचा पुरवठा होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२०-०८-२०१८) :** (१) ठाणे जिल्ह्यात कल्याणकारी संस्था व वसतीगृह या योजनेअंतर्गत शहापूर तालुक्यात ७ आश्रमशाळा आहेत. सदर आश्रमशाळांना पटनिहाय मागणीप्रमाणे तालुकास्तरावरुन रु.६३५/- क्विं.तांदूळ व रु.४६५/- क्विं. गहू याप्रमाणे धान्याचा भरणा करुन धान्य वितरीत करण्यात येते.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

शहापूर तालुक्यातील आश्रमशाळांना त्यांनी केलेल्या धान्याच्या मागणीच्या अनुषंगाने एप्रिल, २०१७ ते जून, २०१८ या कालावधीत एकूण ९९.८५ क्विं. गहू व ९८.२० क्विं. तादूळ इतक्या अन्नधान्याचे वाटप करण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आत्करगाव (ता.खालापूर, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीतील हिरानंदानी कंपनीने गवळी वाडी येथील पाणी पुरवठा बंद केल्याबाबत**

**(२४) ११२६९६ (१४-०४-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आत्करगाव (ता.खालापूर, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीतील हिरानंदानी यांच्या ग्रीन फिल्ड कंपनीने गवळी वाडी येथील पाणी पुरवठा माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान बंद केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१७-०७-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) ग्रुप ग्रामपंचायत आत्करगाव हद्दीतील मौजे आडोशी येथे गवळीवाडी व वाघ्रणवाडी येत असून गवळीवाडीत पिण्याच्या पाण्याची बोअरवेल आहे. परंतु त्या बोअरवेलला पाणी लागले नाही व इतर पाण्याचा स्त्रोत नाही. ग्रामपंचायत माध्यमातून सदर वाडीला टंचाई काळामध्ये पाणी पुरवठा करण्यात येतो. गवळीवाडीला पाणी नसल्यास सदर वाडीतील ग्रामस्थ अर्धा कि.मी. अंतरावरावरील वाघ्रणवाडी येथील विहिरीतून पाणी घेतात.

हिरानंदानी यांची ग्रीन फिल्ड कंपनी सदर दोन्ही वाड्यांच्यामध्ये वसलेली असून या कंपनीने पाण्यासाठी लोणावळा नगरपालिकेतून पाण्याच्या कनेक्शनची परवानगी घेऊन ८ कि. मी. लांबीची ४ इंच व्यासाची पाईपलाईन स्वखर्चाने टाकलेली आहे. गवळीवाडी येथे पाण्याची सिन्टेक्सची ५००० लिटरची टाकी असून ग्रीन फिल्ड रिसोर्ट कंपनी ते गवळीवाडीपर्यंत १ इंच व्यासाची पाईपलाईन ग्रामपंचायतीने टाकली असून त्याद्वारे गवळीवाडी येथे पाणी पुरवठा होतो. ग्रीन फिल्ड कंपनी सदर वाडीला मोफत पाणी पुरवठा करते. परंतु सदर पाणी पुरवठा आठवड्यातून दोन ते तीन वेळा केला जातो. तथापि, कंपनीने पाणी पुरवठा बंद केला अशी बाब नाही.

भविष्यात दोन्ही वाडयांकरीता पिण्यासाठी पाणी पुरवठा होण्याकरीता आत्करगाव ग्रामपंचायतीची मागणी घेऊन पाऊस पाणी संकलन योजना राबविण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वक्फ मंडळाच्या जमिनीवर असलेल्या शासकीय कार्यालयाचे भाडे वक्फ मंडळास देणे असल्याबाबत

**(२५) ११२९७६ (१७-०४-२०१८). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वक्फ मंडळाच्या जमिनीवर असलेल्या शासकीय कार्यालयाचे भाडे सुधारित वक्फ अधिनियम २०१३ नुसार वक्फ मंडळास देणे असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१४ पासून आतापर्यंत किती कार्यालये वक्फच्या जमिनीवर आहेत आणि किती कार्यालयाचे भाडे वक्फ मंडळात जमा करण्यात आले आहे,

(३) तसेच वक्फ मंडळाच्या जमिनीवर झालेले अतिक्रमण हटविण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास याबाबत चौकशी केली आहे काय, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-०७-२०१८) :** (१) होय.

(२) नाही. सन २०१४ पासून आतापर्यंत वक्फ जमिनीवर कार्यालये असल्याचे निदर्शनास आलेले नाही. तथापि, वक्फ अधिनियम, १९९५ मधील तरतुदीनुसार, यापूर्वी वक्फ मालमत्तांवर अस्तित्वात असलेल्या शासकीय/ निमशासकीय कार्यालयाचे भाडे बाजारभावाने वसूल करण्याबाबत वक्फ मंडळाला सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(३) वक्फ अधिनियम १९९५ मधील तरतूदीनुसार अतिक्रमणे हटविण्याबाबत वक्फ मंडळाकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### कोठारी (जि.चंद्रपूर) येथील ग्रामपंचायतीने नळ योजना हस्तांतरणास नकार दिल्याबाबत

**(२६) ११३०३१ (१४-०४-२०१८). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाने खनिज विकास निधीअंतर्गत कोठारी (जि.चंद्रपूर) येथे रुपये ३.५० कोटी किमतीच्या पाणीपुरवठा योजनेचे बांधकाम पूर्ण होऊन माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये चाचणी घेऊनही या योजनेचे पाणी गावक-यांना मिळत नसल्याने ग्रामपंचायतीने नळ योजना हस्तांतरणास नकार दिल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हस्तांतरणास नकार देण्याची कारणे काय आहेत,

(३) याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. बबनराव लोणीकर (२१-०८-२०१८) :** (१) व (२) अंशतः खरे आहे.

खनिज विकास निधीअंतर्गत कोठारी (जि. चंद्रपूर) येथील ३.५१ कोटी किंमतीच्या नळ पाणी पुरवठा योजनेची कामे करण्यात आली असून, दि. ५/९/२०१७ पासून पाणी पुरवठा सुरु करण्यात आला होता. तथापि, जुन्या पाणी पुरवठा योजनेचे थकीत वीजबील न भरल्यामुळे डिसेंबर-२०१७ पासून विज पुरवठा खंडीत करण्यात आला. वीजपुरवठयाअभावी सुरळीत पाणी पुरवठा न झाल्यामुळे ग्रामपंचायतीने योजना हस्तांतरणास नकार दिला होता.

(३) ग्रामपंचायत कोठारी यांचेमार्फत थकीत विजबीलापोटीची रक्कम भरली असून, दिनांक ३०/३/२०१८ रोजी नियमित विद्युत पुरवठा सुरु करण्यात आला आहे. तसेच दिनांक ४/४/२०१८ पासून गावाला सुरळीतपणे पाणी पुरवठा सुरु आहे. योजना १ महिना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून चाचणी स्वरुपात सुरळीतपणे चालविल्यानंतर योजना हस्तांतरण करण्यात येणार आहे.

---

**शिर्डी (जि.अहमदनगर) येथील पाच गावांचा राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमामध्ये समावेश करण्याबाबत**

**(२७) ११३०५७ (१४-०४-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१७-१८ राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या कृती आराखडयास शासनाची मंजूर मिळाली असून त्यामध्ये शिर्डी मतदार संघातील (जि.अहमदनगर) झरेकाठी, खळी मोरवाडी-तरकसवाडी (अस्तगांव) व दहेगाव, को-हाळे या गावांचा समाविष्ट असून सदर गावांच्या योजनांना तांत्रिक व प्रशासकिय मंजूरी देण्याची कार्यवाही चालू असून प्रशासकिय मंजूरी देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रशासकिय मंजूरी देवून योजनेचे काम त्वरीत करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२८-०६-२०१८) :** (१) नाही.

सन २०१७-१८ च्या राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या कृती आराखडयात शिर्डी मतदार संघातील (जि.अहमदनगर) झरेकाठी, खळी, मोरवाडी, तरकसावाडी (अस्तगांव) व दहेगाव कोऱ्हाळे या गावांचा समावेश असून, सदर गावांच्या योजनांना तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी देण्यात आलेली आहे.

(२) सदर योजनांची निविदा प्रक्रियेबाबतची कार्यवाही चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**निढळेवाडी (ता.देवरुख, जि.रत्नागिरी) येथे भारत निर्माण नळ पाणीपुरवठा योजना राबविण्याबाबत**

**(२८) ११३०६४ (१४-०४-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निढळेवाडी (ता.देवरुख जि.रत्नागिरी) येथे पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली असल्याने शासनाने भारत निर्माण नळपाणीपुरवठा योजना राबविण्याचा निर्णय सन २००७ मध्ये वा त्यादरम्यान घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भारत निर्माण नळपाणी पुरवठा योजना ११ वर्षापासून अपूर्ण अवस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरची पाणी पुरवठा योजना राबविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२७-०८-२०१८) :**(१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) निढळेवाडी (ता.देवरुख जि.रत्नागिरी) येथील नळ पाणी पुरवठा योजनेचे काम पूर्ण करुन योजना ग्रामपंचायतीकडे हस्तांतरीत करण्यात आली आहे. सदर योजनेद्वारे पाणी पुरवठा सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### लातूर जिल्हयातील शौचालय उभारणीच्या कामात दिरंगाई झाल्याबाबत

**(२९) ११३१२१ (१९-०४-२०१८). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर जिल्ह्यातील शौचालय उभारणीच्या कामात दिरंगाई करणाऱ्या ६३ ग्रामपंचायतींना नोटीसा बजावण्यात आल्याचे माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच हागणदारीमुक्त गांव योजनेत ७८३ पैकी ७२० ग्रामपंचायतीत २ लाख ८७ हजार, ९४४ शौचालय बांधून १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण केल्याचा दावा केला जात असला तरी यातील बरीच शौचालये कागदोपत्री पूर्ण झाल्याच्या तक्रारी येत आहेत, हे खरे आहे काय,
(३) तसेच, ज्या ग्रामपंचायती १०० टक्के हागणदारीमुक्त गावाचा अहवाल सादर करणार नाहीत त्या ग्रामपंचायतींच्या सरपंचांवर निलंबनाची कारवाई करण्यात येणार असल्याचे सीईओंनी कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
याबाबत अधिकाऱ्यांवर काय कारवाई होणार आहे अथवा होत आहे,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित गावातील शौचालय उभारणीचे काम लवकरात लवकर करुन १०० टक्के हगणदारी मुक्त करण्यासंदर्भात तसेच दिरंगाई करणाऱ्या संबधितावंर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०४-०७-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

दिनांक ०१/०१/२०१८ च्या पत्रान्वये ६२ ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामसेवक यांना कारणे दाखवा नोटीसा देण्यात येऊन दिनांक १०/०१/२०१८ पर्यंत हागणदारीमुक्त करण्याबाबत जिल्हा परिषद,लातूर स्तरावरून निर्देश देण्यात आले होते.

(२) लातूर जिल्हातील एकूण ७८२ ग्रामपंचायतींपैकी ७८२ ग्रामपंचायती हागणदारी मुक्त झालेल्या आहेत. सन २०१२ च्या पायाभूत सर्वेक्षणानुसार लातूर जिल्ह्यातील २,८७,९४४ शौचालय उद्दीष्टामधून दोन वेळा नोंदविलेली, मयत व स्थलांतरीत लाभार्थ्यांची अशी एकूण ४,०२६ नावे वगळून २,८३,९१८ इतक्या शौचालयांचे बांधकाम पूर्ण झाले असून १०० टक्के उद्दीष्ट्य पूर्ण झाले आहे.

(३) होय, हे खरे आहे.

जिल्हा परिषद, लातूर यांच्या पत्रान्वये लातूर जिल्ह्यातील ६२ ग्रामपंचायतींना दिनांक १०/०१/२०१८ पर्यंत ग्रामपंचायत हागणदारी मुक्त करण्याबाबत अन्यथा संबंधित सरपंच अपात्रतेची व ग्रामसेवकावर निलंबनाची कार्यवाही करण्याबाबत निर्देश देण्यात आले होते

(४) दिनांक २६ जानेवारी, २०१८ रोजी लातूर जिल्हा हागणदारीमुक्त घोषित करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुक्ताईनगर-बोदवड-वरणगांव (जि.जळगांव) या परिसरातील ८१ गावांची पाणीपुरवठा योजना तातडीने कार्यान्वीत करण्याबाबत

**(३०) ११३१८५ (१९-०४-२०१८). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्ताईनगर-बोदवड-वरणगांव (जि.जळगांव) परिसरातील ८१ गावांची पाणीपुरवठा योजना कार्यरत होती परंतु योजना अधिक कार्यक्षमतेने कार्यान्वीत करण्यासाठी संबंधित विभागाकडून निविदा मागविण्यात आलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निविदा प्रक्रिया अद्यापी पूर्ण झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी निवेदनाच्या माध्यमातून काम पूर्ण करण्याबाबत मा.मुख्यमंत्र्यांकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२७-०८-२०१८) :** (१) होय.

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत भुसावळ तालुक्यातील ३१ गांवे प्रादेशिक पाणीपुरवठा योजना व मुक्ताईनगर-बोदवड तालुक्यातील ५१ गांवे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या निविदा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत मागविण्यात आल्या होत्या.

(२) हे खरे नाही.

(३) होय.

(४) मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत उपरोक्त दोन्ही पाणीपुरवठा योजनांची निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात येऊन भुसावळ तालुक्यातील ३१ गांवे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या कामाचे कार्यारंभ आदेश दि.२५.०१.२०१८ रोजी व मुक्ताईनगर-बोदवड तालुक्यातील ५१ गांवे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या कामाचे कार्यारंभ आदेश दि.०३.०१.२०१८ रोजी देण्यात आले असून दोन्ही योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## स्वच्छ भारत अभियानासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३१) ११३५१२ (१४-०४-२०१८). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाकडून शहर आणि गाव पातळीवर स्वच्छ भारत अभियानांतर्गत स्वच्छता गृह व पाणंदनमुक्तीच्या माध्यमातून जिल्हयातील ३ लाख ५२ हजार स्वच्छता गृहाची कामे पूर्ण झाली असून सदरील कामाचा ८८ कोटीचा निधी शासनाकडे थकीत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास शासनाकडून सदरील निधी अभावी स्वच्छ भारत अभियानातील कामे प्रलंबित असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास शासनाने रुपये ८८ कोटीचा निधी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (३१-०८-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

नांदेड जिल्हयातील वैयक्तिक शौचालये नसलेल्या कुटुंबांपैकी ३ लाख १० हजार ५५ वैयक्तिक शौचालयाचे बांधकाम करण्यात आले आहे. त्यापैकी २ लाख १३ हजार ४०२ कुटुंबांना प्रोत्साहन अनुदान देण्यात आले आहे. उर्वरीत ९६६५३ लाभार्थ्यासाठी रुपये ११५ कोटी ९८ लाख ३६ हजार इतक्या निधीची आवश्यकता आहे.

(२) हे खरे नाही. सन २०१२ च्या पायाभूत सर्वेक्षणानुसार सर्व कुटुंबांना वैयक्तिक/सामुहिक/ सार्वजनिक स्तरावर शौचालये उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. स्वच्छ भारत अभियान (ग्रा) अंतर्गत नांदेड जिल्हयासह संपूर्ण ग्रामीण महाराष्ट्र राज्य दिनांक १८.०४.२०१८ रोजी हागणदारीमुक्त घोषित करण्यात आले आहे.

(३) व (४) स्वच्छ भारत अभियान (ग्रा) अंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात रु.११५५३२.७१ लक्ष इतका निधी केंद्र शासनाकडून प्राप्त झालेला असून, त्यापैकी रु.८१०५.६२ लक्ष इतका निधी नांदेड जिल्हा परिषदेला वितरीत करण्यात आलेला आहे. सन २०१८-१९ या

वर्षात स्वच्छ भारत मिशन (ग्रा) अंतर्गत केंद्र व राज्य हिश्श्यांतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीमधून आवश्यकतेनुसार नांदेड जिल्हा परिषदेला निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

---

**कोपरगाव (जि. अहमदनगर) येथील धारणगाव पाणीपुरवठा योजनेचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(३२) ११३५२७ (१४-०४-२०१८). श्रीमती स्नेहलता कोल्हे (कोपरगाव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोपरगाव (जि.अहमदनगर) येथील धारणगाव पाणीपुरवठा योजनेचे काम मागील अनेक महिन्यांपासून प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अर्धवट असलेल्या धारणगाव पाणीपुरवठा योजनेच्या कामास गती मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२८-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) धारणगाव पाणी पुरवठा योजनेची सुधारीत किंमत रु. ४९८.१८ लक्ष असून योजनेची ८०% कामे पूर्ण झालेली आहेत. योजनेची पूर्ण झालेली कामे व शिल्लक कामे विचारात घेता योजना पुनर्सुधारीत करणे आवश्यक आहे. पुनर्सुधारीत योजनेची किंमत रु. ६८३.७८ लक्ष इतकी असून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत सदर पुनर्सुधारीत योजनेचा प्रस्ताव तयार करण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.

---

**वर्धा जिल्हयातील महाविद्यालयांना देण्यात आलेल्या अनुदानाची चौकशी करण्याबाबत**

**(३३) ११४१५५ (०५-०४-२०१८). श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्हयातील अग्नीहोत्री इन्स्टिटयुट ऑफ फार्मसी वर्धा, अग्नीहोत्री इन्स्टिटयुट ऑफ टेक्नोलॉजी वर्धा, अग्नीहोत्री पॉलीटेक्नीक नागठाणा वर्धा, पुलगाव पॉलीटेक्नीक पुलगाव, शंकरप्रसाद कॉलेज ऑफ इंजिनियरींग वर्धा, अग्नीहोत्री कॉलेज ऑफ इंजिनियरींग वर्धा या महाविद्यालयाला सहायक संचालक तंत्र शिक्षण विभाग नागपूर यांच्याकडून सन २०१०-११ ते सन २०१७-१८ पर्यंत टयूशन फी, शिष्यवृती, ग्रंथालय अनुदान व इतर अनुदान मोठया प्रमाणात प्राप्त झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोणकोणत्या प्रकारचे व कोणकोणत्या वर्षात किती अनुदान प्राप्त झाले आहे,

(३) असल्यास, सदर अनुदानाव्दारे मिळालेली रक्कम तसेच इतर विभागाकडून सुध्दा सदर महाविद्यालयांनी उचल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे, त्यात काय आढळून आले, त्यानुसार संबधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याचा तपशिल काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१३-०८-२०१८) :** (१) होय, अंशत: खरे आहे.
(२) उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत सदर महाविद्यालयांना सन २०१०-११ ते सन २०१६-१७ पर्यंत आर्थिक दुर्बल घटकातील बीगरमागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना (EBC) शिक्षण शुल्काच्या ५०% प्रतिपूर्तीची रक्कम वितरीत करण्यात आलेली आहे.

तसेच सन २०१७-१८ या वर्षामध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्काची शिष्यवृत्तीची रक्कम देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

सन २०१०-११ ते सन २०१६-१७ या कालावधीत सदर महाविद्यालयांना शिक्षण शुल्काच्या ५०% प्रतीपूर्तीची देण्यात आलेली रक्कम खालीलप्रमाणे आहे.

| शैक्षणिक वर्ष | प्रतीपूर्तीची रक्कम |
|---|---|
| २०१०-११ | रु. ३६,१४,०५१/- |
| २०११-१२ | रु. ४७,७५,३२९/- |
| २०१२-१३ | रु. ६४,२३,५४२/- |
| २०१३-१४ | रु. ३२,५२,९०७/- |
| २०१४-१५ | रु. ३२,८३,४२७/- |
| २०१५-१६ | रु. ३१,५८,९२७/- |
| २०१६-१७ | रु. ३३,८९,१६९/- |

(३) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग व आदिवासी विकास विभागांतर्गत सदर महाविद्यालयांना सन २०१०-११ ते सन २०१७-१८ पर्यंत त्या-त्या मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांकरीताची टयुशन फी, परीक्षा फी, ग्रंथालय अनुदानाची रक्कम वितरीत करण्यात आलेली आहे.
(४) भारत सरकार शिष्यवृत्ती योजनेंतर्गत झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी गृह विभागाकडून स्थापन करण्यात आलेल्या विशेष चौकशी पथकाने (SIT) दिनांक २४.०७.२०१७ रोजी शासनास सादर केलेल्या अंतिम अहवालाच्या अनुषंगाने आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांच्यामार्फत विशेष चौकशी पथकाकडील लेखा परिक्षणाचे अभिलेखे यामधील जिल्हानिहाय आकडेवारीची पडताळणी व विश्लेषनाची कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात जीवनावश्यक वस्तूंची मोठ्या प्रमाणात दर वाढ झाल्याबाबत**

**(३४) ११४३७३ (१४-०४-२०१८). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सणासुदीच्या दिवसात डाळीसह कांदे, खाद्यतेल तसेच इतर जीवनावश्यक वस्तूंचे मोठया प्रमाणात पुन्हा दर वाढल्यामुळे नागरीकांमध्ये तीव्र असंतोष पसरला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास आढळून आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दरवाढ रोखण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार डाळीसह, कांदे, तेल व जीवनावश्यक वस्तूंवर नियंत्रण आणणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०९-०८-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) राज्यात जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ व काळाबाजार प्रतिबंध तसेच जीवनावश्यक वस्तुंचा सुरळीत पुरवठा अधिनियम १९८० अंतर्गत नियमीतपणे कार्यवाही करण्यात येत आहे. याबाबत क्षेत्रिय कार्यालयांना दि.१६.०४.२०१६, दि.२०.०६.२०१६ व दि.२३.०९.२०१६ चे पत्र तसेच दि.१.०७.२०१६ चे अर्धशासकीय पत्र व दि.१७.०४.२०१८ च्या पत्रान्वये सुचना देण्यात आल्या आहेत.

भविष्यात तूर/तूरडाळ, खादयतेल बिया व इतर कडधान्ये यांच्या वाढीव किंमती नियंत्रित करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांबाबतचा कृती आराखडा (Action Plan) तयार करण्यासाठी दि.२८.१२.२०१५ च्या शासन निर्णयान्वये दर नियंत्रक समिती (Price Monitoring Committee) गठीत करण्यात आली आहे. सदर समितीच्या वेळोवेळी बैठका घेऊन जीवनावश्यक वस्तूंचे दर नियंत्रित ठेवण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**कोकणातील ग्रामपंचायती मुख्यमंत्री पेयजल योजनांपासून वंचित असल्याबाबत**

**(३५) ११४६९८ (१४-०४-२०१८). श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय पेयजल योजनेची कामे बंद असल्यामुळे पुढील कामे मुख्यमंत्री पेजयल योजनेतंर्गत राबविण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजना एक हजारापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतीद्वारे राबविण्याची अट घालण्यात आल्यामुळे कोकणात १००० पेक्षा कमी असलेल्या कांही ग्रामपंचायती असल्यामुळे मुख्यमंत्री पेयजल योजनांच्या अटी व शर्तीमुळे सदरहू योजना ग्रामपंचायतींना राबविता येत नसल्यामुळे कोकणातील ग्रामपंचायती या योजनापासून वंचित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधिंनी दिनांक १५ डिसेंबर, २०१६ रोजी मा.पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्र्याकडे पत्रव्यवहार करुनही सदर योजनेसंदर्भात फेरविचार करण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने  चौकशी करुन कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२९-०६-२०१८) :** (१) होय.
(२) होय.
(३) व (४) दिनांक. १३.११.२०१७ रोजी मा.मंत्री (पा.पु.व.स्व.) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत १ हजार लोकसंख्येच्या आतील गावांचा समावेश करुन मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल टप्पा-२ राबविण्याचे निर्देश दिले आहेत. तथापि सदर योजना राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमांतर्गत सन २०१८-१९ च्या कृती आराखडयात समाविष्ट असल्यास करता येतील.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दौंड तालुक्यातील पाणीपुरवठा योजनांचा समावेश मुख्यमंत्री पेयजल योजना टप्पा २ मध्ये करणेबाबत**

**(३६) ११४७२९ (१४-०४-२०१८). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दौंड तालुक्यातील केडगाव, भांडगाव, कडेठाण, स्वामीचिंचोली, पडवी, वरवंड, कुरकुंभ, बिरोबावाडी, कासुर्डी, गार, नानविज, सोनवडी व लिंगाळी या गावांतील पाणीपुरवठा योजनांचा समावेश मुख्यमंत्री पेयजल योजनेच्या टप्पा २ मध्ये करण्याची विनंती केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत लोकप्रतिनिधींनी माहे मार्च, २०१७ पासून दिनांक ६ मार्च, २०१७, ३ जून, २०१७ व १६ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत दिनांक १३ नोव्हेंबर २०१७ रोजी बैठक आयोजित करण्यात आलेली होती त्यामध्ये टप्पा २ मध्ये उक्त योजनांचा समावेश करण्याचे आश्वासन देण्यात आले होते हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त योजनांचा समावेश टप्पा २ मध्ये करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२९-०६-२०१८) :** (१), (२) व (३) होय.
(४) उक्त योजनांचे प्रस्ताव विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरातील मल्टिप्लेक्समध्ये सुरु असलेल्या मनमानी कारभाराबाबत**

**(३७) ११५०९३ (२४-०४-२०१८). प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मल्टीप्लेक्स चित्रपट गृहातील वाढलेले तिकीट दर, खाद्यपदार्थ व पार्किंगसाठी आकारण्यात येणारे अवाजवी दर तसेच पार्किंगचे पैसे आकारणाऱ्या मल्टीप्लेक्सवर कारवाईचे संकेत जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत देण्यात येवून सुद्धा त्याची अंमलबजावणी होत नसल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सेनापती बापट रस्त्यावरील नुकत्याच सुरु झालेल्या एका मल्टीप्लेक्समध्ये खाद्यपदार्थाचे दर सामान्य माणसांच्या अवाक्याच्या बाहेरचे असून पाण्याची बाटली ८० ते १०० रु, खारीपॅटीस १२० रु व ज्यूस तब्बल २०० रु तसेच दुचाकी पार्किंग साठी २० रु. व पावती हरवल्यास ७० रु. मोजावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, संगणकीय व्यवस्थेचे कारण पुढे करून पुण्यातील अनेक मल्टिप्लेक्समध्ये अशा प्रकारे पैसे उकळण्याचे प्रकार सुरु असून प्रेक्षकांना बाहेरील खाद्यपदार्थ व पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या देखील नेण्यास मनाई आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार मनमानी करणाऱ्या मल्टिप्लेक्सवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. गिरीश बापट (०४-०८-२०१८) :** (१), (२), (३), (४), (५) पॅकबंद पाण्याची बाटली एम.आर.पी.पेक्षा जास्त दराने विकणे ही बाब वगळता इतर बाबींचे दर शासनाच्या कार्यकक्षेत येत नाहीत.

सेनापती बापट रस्त्यावरील नुकत्याच सुरू झालेल्या मल्टीप्लेक्सची तपासणी केली असता तेथे पॅकबंद पाणी बाटली छापिल किमंतीपेक्षा जादा दराने विक्री होत असल्याचे आढळून आलेले नाही.

---

**लासलगावचा (ता.निफाड जि.नाशिक) मुख्यमंत्री ग्रामीण सांडपाणी प्रक्रिया व्यस्थापन प्रकल्प योजनेमध्ये समावेश करणेबाबत**

**(३८) ११७७११ (२३-०७-२०१८). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लासलगाव (ता.निफाड जि.नाशिक) या गावाचा मुख्यमंत्री ग्रामीण सांडपाणी प्रक्रिया व्यस्थापन प्रकल्प योजनेमध्ये समावेश करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक १० एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा. पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (३०-०८-२०१८) :** (१) होय,हे खरे आहे.
(२) पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामध्ये राज्यातील ग्रामीण भागात सांडपाणी व्यवस्थापन प्रक्रिया प्रकल्प राबविण्याकरिता धोरणात्मक निर्णय घेण्याची कार्यवाही शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अखिल भारतीय प्रशासकीय सेवांमधील गुणवत्ताधारित विशेष शिष्यवृत्ती योजनेमध्ये सुधारणा करण्याबाबत**

**(३९) ११७८०२ (२०-०७-२०१८). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत निवड होणाऱ्या अखिल भारतीय प्रशासकीय सेवांमध्ये महाराष्ट्रातील अधिकाऱ्यांचे प्रमाण वाढावे यासाठी शासनाने सुरु केलेल्या गुणवत्ताधारित विशेष शिष्यवृत्ती योजनेमध्ये सुधारणा करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक ११ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांना लेखी निवेदनाद्वारे सूचना केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त सूचनांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-०८-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) दिनांक १६ एप्रिल, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये, केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत निवड होणाऱ्या अखिल भारतीय प्रशासकीय सेवांमध्ये महाराष्ट्रातील अधिकाऱ्यांचे प्रमाण वाढावे यासाठी गुणवत्ताधारित विशेष शिष्यवृत्ती योजना सुरु करण्यात आलेली आहे. मा. लोकप्रतिनिधी यांनी सदर योजनेत सुचविलेल्या सुधारणांच्या अनुषंगाने आवश्यक ती तपासणी करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**औरंगाबाद जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अन्नसुरक्षा योजनेंतर्गत धान्य पुरवठा करण्याबाबत**

**(४०) ११८९०८ (२३-०७-२०१८). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद जिल्ह्यात मे व जून, २०१७ मध्ये शेतकरी अन्नसुरक्षा योजनेत मिळालेला धान्य कोटा शेतकऱ्यांना अद्यापी मिळाला नसल्याने शेतकऱ्यांनी जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या विरोधात मा.महसूल मंत्री तसेच जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे लेखी तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांनी वारंवार तक्रारी करुनही पुरवठा अधिकारी यांच्याविरोधात कोणतीच कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (३०-०८-२०१८) :** (१) व (२) हे खरे आहे.

मा. मंत्री (अ. ना. पु. व ग्रा. सं.) यांच्या आदेशांनुसार औरंगाबाद जिल्हयातील एपीएल शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांना माहे मे व जून, २०१७ मध्ये अन्नधान्याचा पुरवठा न झाल्याप्रकरणी चौकशी करण्याकरीता श्री. भा. बा. पाटील, उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांची नेमणूक करण्यात आली होती. त्यानुसार श्री. भा. बा. पाटील, उपसचिव यांनी सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने मा. मंत्री (अ.ना.पु.व ग्रा.सं.) यांनी दिलेल्या निदेशांनुसार अनुषंगाने उप आयुक्त (पुरवठा), नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र पथक नेमण्यात आले. श्री.प्रविण पुरी, उप आयुक्त (पुरवठा) यांनी सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने शासनस्तरावर पुढील कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालेगाव (जि.नाशिक) शहर तसेच परिसरातील नागरीकांना नियमित रॉकेल व धान्याचा पुरवठा होण्याबाबत**

**(४१) ११९३५९ (२३-०७-२०१८). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगाव (जि.नाशिक) शहर व परिसरातील सर्वसामान्य शिधापत्रिकाधारकांना नियमित केरोसीन व धान्य पुरवठा होण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी निवेदनाद्वारे मा.अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांचेकडे दिनांक २० फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०९-०८-२०१८) :** (१) व (२) मालेगाव (जि.नाशिक) शहर व परिसरातील सर्वसामान्य शिधापत्रिकाधारंकांना नियमित धान्य पुरवठा होण्याबाबत शासनास निवेदन प्राप्त झालेले नाही.

तथापि, श्री.आसिफ शेख, मा.विधानसभा सदस्य यांनी दि.२० फेब्रुवारी, २०१८ च्या पत्रान्वये मालेगाव शहरातील ६०,००० शिधापत्रिकाधारकांना केरोसिन वितरण करण्याबाबत शासनास विनंती केली होती. त्यानुषंगाने श्री. आसिफ शेख, मा.विधानसभा सदस्य यांना सदर प्रकरणाच्या वस्तुस्थितीबाबत दि.६ जून, २०१८ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात विशेषत: नाशिक जिल्हयात केंद्रीय राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेत पात्र लाभार्थ्यांचा समावेश करण्याबाबत**

**(४२) ११९३७८ (२३-०७-२०१८). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: नाशिक जिल्हयात केंद्रीय राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमाची अंमलबजावणी दिनांक १ फेब्रुवारी, २०१४ मध्ये सुरु करण्यात आली असून सदर योजनेंतर्गत नव्याने लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी दिनांक ३ मार्च, २०१७ च्या शासन निर्णयाप्रमाणे जिल्हानिहाय सुधारित इष्टांक देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत योग्य व गरजू लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी सूचना निर्गमित करण्यात आल्या असून त्यादृष्टीने राज्यात सर्व शिधापत्रिकांचे आधार सिडींगचे काम करण्यात येत असून सर्व पात्र लाभार्थ्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेमध्ये समाविष्ट करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२३-०८-२०१८) :** (१) व (२) होय.

दिनांक ३.३.२०१७ च्या शासन निर्णयान्वये दिनांक ३०.०९.२०१६ रोजी अस्तित्वात असलेल्या लाभार्थ्यांच्या आधारे नाशिक जिल्हयासह राज्यातील सर्व जिल्हयांना सुधारित वाढीव इष्टांक देण्यात आला आहे. सदर इष्टांकानुसार पात्र लाभार्थ्यांची निवड करण्यात आली असून, सदर पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्याचे वाटप करण्यात येत आहे.

राज्यातील आधार सिडींगचे काम अद्यापही सुरु असल्याने, राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेमध्ये जास्तीत जास्त योग्य व गरजु लाभार्थ्यांचा समावेश व्हावा या दृष्टीने नवीन लाभार्थ्यांची निवड करताना दिनांक ३० एप्रिल, २०१८ पर्यंतच्या शिधापत्रिकांचा समावेश करण्याबाबतचा निर्णय दिनांक २१.०५.२०१८ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. सदर शासन निर्णयानुसार नवीन लाभार्थ्यांची निवड प्रक्रिया सुरु असून, आवश्यकतेनुसार जिल्हानिहाय इष्टांक सुधारीत करुन देण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**म्हावशी (ता.पाटण, जि.सातारा) येथील जलस्वराज योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या नळ पाणीपुरवठा योजनेच्या कामाबाबत**

**(४३) ११९८५९ (२३-०७-२०१८). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे म्हावशी (ता.पाटण, जि.सातारा) येथे कोयना नदीकाठी जलस्वराज्य योजनेंतर्गत नवीन इंटेक विहीर व जलशुध्दीकरण यंत्रणेसह नवीन नळ पाणी पुरवठा योजना मंजूर करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेच्या कामांमध्ये कोयना नदीकाठावर नवीन इंटेक विहीरी खोदून विहीरीवरुन नळ पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करणे आवश्यक असताना संबंधीत ठेकेदारांकडून नवीन विहीर न खोदता कोयना नदीमध्ये चर काढून जुन्या नळ पाणी पुरवठा योजनेच्या विहीरींमधूनच पाणी पुरवठा करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गावातील सांडपाणी व ओढयाचे पाणी हे जुन्या विहीरीत जात असल्याने तसेच या ठिकाणी जलशुध्दीकरण यंत्रणाही बसविली गेली नसल्याने गावातील ग्रामस्थांना अशुध्द पाण्याचा पुरवठा होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर योजनेच्या देखभाल दुरुस्ती करीता ग्रामपंचायतीकडून लाखो रुपयांचा खर्च करण्यात आला असून केलेल्या खर्चाची सविस्तर माहिती ग्रामस्थांनी संबंधितांकडे दिनांक १६ डिसेंबर, २०१२ रोजी माहितीच्या अधिकाराखाली लेखी अर्जाव्दारे मागविली असता अद्याप ही माहिती मिळाली नाही अशी माहिती देण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरच्या मंजूर झालेल्या नळ पाणी पुरवठा योजनेच्या अपुर्ण व निकृष्ट दर्जाच्या कामाची चौकशी होणेबाबत संबंधित गावातील ग्रामस्थांनी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, सातारा, जिल्हा परिषद सातारा यांचेकडे दिनांक २९ मार्च, २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राव्दारे मागणी केली होती. हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी ग्रामपंचायतीने शासनाची दिशाभूल केली असल्याने शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१६-०८-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

मौजे म्हावशी (ता.पाटण, जि.सातारा) येथे जलस्वराज्य योजनेअंतर्गत मंजूर योजनेमध्ये नवीन विहीरीची (जॅक वेल) खोदाई करण्याचे काम अंतर्भूत नव्हते. कोयना नदीमध्ये या योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या इंटेक वेलमधून कनेक्टींग पाईपद्वारे अस्तित्वातील जुन्या विहीरीमध्ये (जॅक वेल) पाणी घेण्यात येवून पाणी पुरवठा करणे अशी तरतूद होती.त्याप्रमाणे काम पूर्ण झालेले आहे.

(३) हे खरे नाही.

या योजनेअंतर्गत नवीन जलशुद्धीकरण यंत्रणा बांधण्यात आली आहे व त्यामधून शुद्ध पाण्याचा पुरवठा ग्रामस्थांना करण्यात येतो.

(४) हे खरे आहे.

श्री.उत्तम अनंत मोळावडे, म्हावशी या अर्जदाराने माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत दिनांक १६ नोव्हेंबर, २०१२ रोजीच्या अर्जाद्वारे माहिती मागितलेली असून तत्कालीन अध्यक्ष / सचिव, ग्रामीण पाणी पुरवठा समिती, म्हावशी, ता.पाटण, जि.सातारा यांनी अर्जदारास माहिती उपलब्ध करून दिल्याचे उपलब्ध झालेल्या कागदपत्रांवरून दिसून येत नाही.

(५) हे अंशत: खरे आहे.

सदर योजनेच्या कामाबाबत ग्रामस्थांकडून तक्रार प्राप्त झालेली नाही. तथापि, श्री.शंभूराज देसाई, मा.विधानसभा सदस्य यांनी दिनांक २९ मार्च, २०१५ च्या पत्रान्वये या योजनेचे काम अपूर्ण व निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा यांचेकडे तक्रार केली आहे.

(६) जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाने दिनांक ११ मे, २०१६ च्या पत्रान्वये योजनेच्या कामाची सखोल तपासणी करण्याबाबत त्रयस्थ तांत्रिक यंत्रणा म्हणून शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड यांना कळविले होते. त्यानुसार शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड यांनी योजनेची तपासणी करून अहवाल सादर केला आहे. तपासणी अहवालानुसार योजनेचा दर्जा समाधानकारक आहे.

सदर योजना म्हावशी ग्रामपंचायतीकडे हस्तांतरीत करण्यात आली असून, सन २०११ पासून ग्राम पंचायतीकडून गावात दैनंदिन पाणी पुरवठा करण्यात येत आहे. शुद्ध पाणी पुरवठ्यासाठी जलशुद्धीकरण केंद्र बांधण्यात आले असून, त्यातून म्हावशी गावामध्ये पाणी पुरवठा सुरू आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रत्नागिरी जिल्ह्यात ११३ रेशन दुकाने बंद असल्याबाबत

**(४४) ११९९१६ (२३-०७-२०१८). श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्रत्येक महसूली गावाला सरकार मान्य एक रास्त दर धान्य दुकान असे शासनाचे धोरण असताना रत्नागिरी जिल्ह्यातील १५३६ महसुली गावांमध्ये केवळ ९४८ रेशन दुकाने मंजूर असून त्यापैकी ११३ रेशन दुकाने बंद आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रेशन दुकाने बंद असण्याची कारणे काय आहेत तसेच बंद दुकाने तातडीने सुरू करून नागरिकांना त्याचा फायदा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (३०-०८-२०१८) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

रत्नागिरी जिल्ह्यामध्ये एकूण महसूली गावांची संख्या १५३६ आहे. त्यापैकी ९४६ दुकाने मंजूर असून त्यापैकी ८४४ दुकाने कार्यरत आहेत. सद्यस्थितीत एकूण १०२ दुकाने राजीनामा, निलंबन इत्यादी कारणामुळे बंद असून दुसऱ्या दुकानांना जोडण्यात आलेली आहेत.

जिल्ह्यातील कोणताही लाभार्थी धान्याच्या लाभापासून वंचित राहणर नाही, याची खात्री करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगाव (जि.जळगांव) तालुक्यात अन्नपुर्णा योजनेसाठी धान्य पुरवठा करण्याबाबत**

**(४५) ११९९५९ (२३-०७-२०१८). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव जिल्ह्यातील अंध-अपंग, विधवा, एच.आय.व्ही. ग्रस्त, कॅन्सरग्रस्त, तृतीयपंथी यांना सुमारे २ ते ३ वर्षापासून वाढीव अंत्योदय/ प्राधान्य योजनेचा लाभ सन २०१४ पासून मिळाला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जळगाव तहसिलतंर्गत (पुरवठा शाखा) अन्नपूर्णा योजनेसाठी गत १ वर्षापासून किमान २३६ व त्यापेक्षा जास्त पात्र लाभार्थ्यांना धान्य मिळत नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२३-०८-२०१८) :** (१) हे खरे नाही.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार अंध, अपंग, विधवा, एच.आय.व्ही.ग्रस्त, कॅन्सरग्रस्त, तृतीयपंथी, कुष्ठरोगी इत्यादींना अंत्योदय अन्न योजनेचा लाभ देण्यात येतो.

तसेच, शासन निर्णय दिनांक २१.०५.२०१८ अन्वये नवीन लाभार्थ्यांची निवड करताना दिनांक ३०.०४.२०१८ पर्यंतच्या शिधापत्रिकांचा समावेश करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे. निवड प्रक्रिया सुरु असून, आवश्यकतेनुसार जिल्हानिहाय इष्टांक सुधारीत करुन देण्यात येत आहे.

(२) केंद्र शासनाकडून अन्नपूर्णा योजनेकरिता माहे ऑक्टोबर, २०१५ पासून अन्नधान्याचे नियतन देण्यात आले नसल्याने जिल्हानिहाय नियतन देण्यात आलेले नाही. तथापि, जळगाव तालुक्यातील अन्नपूर्णा योजनेतील २३३ लाभार्थ्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेत वर्ग करण्यात आले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम राबविण्याबाबत**

**(४६) १२२०३० (२३-०७-२०१८). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.भास्कर जाधव (गुहागर),**

**श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागातील जनतेस नियमित आणि शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध होण्यासाठी राज्यात मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमातंर्गत रुपये २ हजार ५०० कोटीच्या कामांना प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देण्यात आल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचा आढावा घेण्यासाठी दिनांक ११ एप्रिल, २०१८ रोजी मंत्रालयामध्ये मा.मुख्यमंत्री व मा.पाणीपुरवठामंत्री यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयांचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार राज्यातील जनतेस उक्त योजनेव्दारे पाणी पुरवठा होण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२७-०८-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

विभागाच्या दि. ०७ मे, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये सन २०१६-१७ ते २०१९-२० या कालावधीत राज्यात मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला असून सदर कार्यक्रमाच्या अंमलबजावणी करिता रु.२५३०.८६ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

सदर कार्यक्रमांतर्गत जुलै-२०१८ अखेर नव्याने घ्यावयाच्या रु.१५९४.५२ कोटी इतक्या किंमतीच्या ७७५ पाणीपुरवठा योजनांना मंजूरी देण्यात आली आहे. तसेच रु.२४.७३ कोटी इतक्या किंमतीच्या बंद असलेल्या १८ प्रादेशिक पाणीपुरवठा योजना पुनरुज्जीवित करण्यास मंजूरी देण्यात आली आहे.

(२) होय.

(३) उक्त बैठकीमध्ये मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे सूचना देण्यात आल्या. नव्याने घ्यावयाच्या योजना ३० एप्रिल, २०१८ पर्यंत मंजूर करणे, पुनरुज्जिवित करावयाच्या योजनांकरिता ७० टक्के पाणीपट्टी वसुलीची अट शिथिल करणे, पुनरुज्जिवित करावयाच्या प्रादेशिक योजनातून पाणी घेण्यास शैक्षणिक/औद्यगिक/व्यापारी संस्था तयार आहेत का याबाबत तपासणी करणे, निकोप व स्पर्धात्मक वातावरणात प्राप्त झालेल्या ५ टक्के पर्यंत जादा दराच्या निविदा स्विकृत करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करणे, कार्यादेश देण्याकरिता आवश्यक रस्ते/रेल्वे/वने क्रॉसिगची अट शिथिक करणे, नवीन योजनांमध्ये शक्य तेथे सौरऊर्जा पंप वापरणे. त्यानुसार सदर कार्यक्रमाच्या अंमलबजावणीतील अडथळे दूर करण्यात आले असून मंजूर योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण (जि.ठाणे) येथील शिधावाटप दुकानाचे प्राधिकारपत्र वारसांच्या नावे न करता इतर व्यक्तींच्या नावे केल्याबाबत**

**(४७) १२२५२७ (२३-०७-२०१८). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) येथील शिधावाटप कार्यालयाने शिधावाटप दुकानाचे प्राधिकारपत्र मृत व्यक्तीच्या वारसांच्या नावे न करता अनोळखी व्यक्तींच्या नावे केल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत पीडित जेसानी कुटुंबियांनी माहिती अधिकारात विचारलेल्या माहितीत याविषयी कोणतीच माहिती उपलब्ध नसल्याचे लेखी उत्तर देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार संबंधीत दोषी अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (३०-०८-२०१८) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

जेसाणी कुटुंबीयाने माहितीच्या अधिकारात फ परिमंडळ कार्यालयात मागितलेली माहिती सन २००३ मधिल असल्याने फ परिमंडळ कार्यालयातील अभिलेख पडताळणी केली असता माहिती उपलब्ध न झाल्याने/आढळून न आल्याने तसे नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांच्यामार्फत अर्जदारास कळविण्यात आले आहे.

अधिकृत शिधावाटप दुकान क्र.३८ फ २४ चे प्राधिकारपत्र श्री.सकरलाल जगजीवन यांच्या नावे आहे. सदर दुकानाला भूपतराय नागरदास ॲण्ड कंपनी असे व्यावसायीक नाव आहे. मात्र प्राधिकारपत्रधारक म्हणून भूपतराय नागरदास यांचे नाव नमूद नाही. फ परिमंडळ कार्यालयाने त्यावेळी केलेली कार्यवाही योग्य असल्याने कोणावर कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रेवसा, खारतळेगाव व वाठोडा (शु) (जि.अमरावती) या गावांत पाण्याच्या टाक्यांचे बांधकाम करण्याबाबत**

**(४८) १२३७७४ (२५-०७-२०१८). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील रेवसा, खारतळेगाव व वाठोडा (शु) या गावात पाण्याच्या टाक्यांचे बांधकाम करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २८ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अमरावती यांचेकडे निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त कामासाठी निधी उपलब्ध होण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (३१-०८-२०१८) :** (१) होय, खरे आहे.
(२) सदरच्या कामाचा समावेश राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम कृती आराखडा सन २०१८-२०१९ अंतर्गत करण्याबाबतची कार्यवाही करण्यात आली आहे. सदर कृती आराखड्यास मंजुरी प्राप्त होताच निधी उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक शहर व तालुक्यात केशरी शिधापत्रिकाधारक ग्राहकांचे बंद केलेले धान्य पुन्हा सुरु करण्याबाबत

**(४९) १२४११४ (२३-०७-२०१८). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक शहर व तालुक्यात केशरी शिधापत्रिकाधारक ग्राहकांचे बंद करण्यात आलेले धान्य पुन्हा सुरु करण्याची मागणी राज्यातील विविध संघटना, राजकीय पक्ष व लोकप्रतिनिधींनी लेखी तक्रार तसेच निवदेनाव्दारे जिल्हा पुरवठा अधिकारी यांचेकडे दिनांक २८ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय.
(२) असल्यास, सदर योजनेत समाविष्ट नसलेल्या एपीएल लाभार्थ्यांना अन्नधान्य वितरीत करण्यासाठी वाढीव अनुदान देण्याचा निर्णय शासनाच्या विचाराधीन असून केशरी शिधापत्रिका धारकांना धान्य त्वरीत उपलब्ध करुन देण्यासाठी कोणत्या उपायोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२३-०८-२०१८) :** (१) होय.
(२) शिधापत्रिकांचे आधार सिडींग करताना अपात्र शिधापत्रिकाधारकांची लाभार्थी म्हणून नोंद होणार नसल्याने त्या शिधापत्रिका आपोआप रद्द होतील. या प्रक्रियेमुळे प्राप्त झालेल्या इष्टांकामध्ये नवीन पात्र लाभार्थ्यांचा समावेश करण्यात येईल.

राज्यातील आधार सिडींगचे काम अद्यापही सुरु असल्याने, राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेमध्ये जास्तीत जास्त योग्य व गरजु लाभार्थ्यांचा समावेश व्हावा या दृष्टीने नवीन लाभार्थ्यांची निवड करताना दिनांक ३०.०४.२०१८ पर्यंतच्या शिधापत्रिकांचा समावेश करण्याबाबतचा निर्णय दिनांक २१.०५.२०१८ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. सदर शासन निर्णयानुसार नवीन लाभार्थ्यांची निवड प्रक्रिया सुरु असून, आवश्यकतेनुसार जिल्हानिहाय इष्टांक सुधारीत करून देण्यात येत आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नेवासा (जि.अहमदनगर) येथील पुरवठा विभागातील तालुका दक्षता कमिटीबाबत**

**(५०) १२४३१० (२३-०७-२०१८). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेवासा (जि.अहमदनगर) येथील पुरवठा विभागातील तालुका दक्षता कमिटीमध्ये प्राधान्य कुटुंब लाभार्थी निवड शासनाच्या धोरणात्मक निर्णयानुसार ७६:३२ इतका इष्टांक पूर्ण करणे संदर्भात बैठकीत सूचना देवूनही पूर्ण करण्यात आला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषी अधिका-यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२३-०८-२०१८) :** (१) हे खरे नाही.

राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजना योजनेअंतर्गत शासन निर्णय दिनांक ३.३.२०१७ अन्वये अहमदनगर जिल्हयास दिलेल्या वाढीव इष्टांकामधून नेवासा तालुक्यासाठी प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांसाठी देण्यात आलेल्या इष्टांकानुसार २,४०,१२२ एवढ्या लाभार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. सदर लाभार्थ्यांना अन्नधान्याचा लाभ सुरळीतपणे देण्यात येत आहे.

केंद्र शासनाने दिलेल्या एकूण इष्टांकासाठी ग्रामिण व शहरी भागासाठी विहित केलेला अनुक्रमे ४५.३४ टक्के व ७६.३२ टक्के एवढा इष्टांक हा राज्यासाठी विचारात घेण्यात आला असून, इष्टांक पूर्ण करताना तसेच लाभार्थ्यांची निवड करताना गावनिहाय / तालुकानिहाय / जिल्हानिहाय विचार करण्यात येत नाही.

तसेच, शासन निर्णय दिनांक २१.०५.२०१८ अन्वये नवीन लाभार्थ्यांची निवड करताना दिनांक ३०.०४.२०१८ पर्यंतच्या शिधापत्रिकांचा समावेश करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे. निवड प्रक्रिया सुरु असून, आवश्यकतेनुसार जिल्हानिहाय इष्टांक सुधारीत करुन देण्यात येत आहे.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.